# प्रकरण पाचवे

## ' उपसंहार '

## प्रकरण - पाचवे

## उपसंहार

श्री. वि. शं. पारगावकरांनी प्रामुख्याने कथा व कादंबरी या वाङ्मय-प्रकारात लेखन केलेले आहे. त्यांच्या 'अपरंपार' व 'अयोनिजा' या कादंबऱ्यांच्या अभ्यासाद्वारा त्यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये शब्दांकित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधिकेत करण्यात आलेला आहे. प्रबंधिकेची प्रकरणशः सारांशात्मक रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

पहिल्या प्रकरणात 'साठोत्तरी मराठी साहित्यविश्वा' चा आढावा घेण्यात आला आहे.

मराठी साहित्यात नवसाहित्योत्तरी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, नव साहित्य हे मुख्य प्रवाह आहेत.

___ साठोत्तरी साहित्यात जनसाहित्याच्या प्रवाहाच्या दिशेने पुढे जाणाऱ्या नवसाहित्योत्तरी साहित्याची काही वैशिष्ट्ये म्हणजे मानवी जीवनावर नियतीचा असणारा प्रभाव , समाजाचे सूक्ष्म निरीक्षण, वास्तववाद, अस्तित्ववाद या तत्वप्रणालींचे कलात्मक उपयोजन, प्रायोगिकता , संमिश्र भावानुभवाचे प्रत्ययकारी चित्रण, आशयानुरूप भाषाशैली ही आहेत.

___ दलित साहित्याने दलितांची अस्मिता जागी केली. हे साहित्य प्रस्थापित

समाजमूल्यांच्या विरोधात उभे राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत.

___ ग्रामीण साहित्यातून ग्रामजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण येते. ग्रामीण भाषेच्या कलात्मक उपयोजनातून ग्रामसंस्कृती आविष्कृत झालेली आहे.

___ आदिवासींच्या शिक्षणासाठी ग्रंथालय , प्राथमिक , माध्यमिक शाळा याद्वारा खूप प्रयत्न करण्यात आले. 'झेलझपाट ' सारखी लक्षणीय कादंबरी या साहित्यात निर्माण झाली.

___ जनसाहित्याची संकल्पना द्विध्रुवी आहे. या संकल्पनेत सामाजिक मूल्यात्मकता आणि वाङ्‌मयीन मूल्यात्मकता हातात हात घालून चालतात.

___ या कालखंडात कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, ललित गद्य या वाङ्‌मय प्रकारात भरीव स्वरूपाचे लेखन झाले. कथा- कादंबरीतील भावानुभवाचे क्षितीज विस्तारले. भावानुभवाची अधिक मोठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य वृध्दिंगत झाले. नाट्कात प्रायोगिकता आली. भाषांतर रुपांतराव्दारा अन्यभाषांशी आदान- प्रदान घडले. कवितेने परंपरेचा नव्याने शोध घेतला. ती अधिक चिंतनपर तशीच वास्तववादी झाली. लघुनिबंधास काव्यात्मकता, चिंतनात्मकता लाभली. तसेच लेखकाचा जीवनविषयक दृष्टीकोन , सूक्ष्म निरीक्षण, व्यासंग यांचे मनोहारी प्रतिबिंब लघुनिबंधात पडले.

जीवनाच्या क्षेत्रांचा विस्तार झाल्यामुळे विविध क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे लिहिण्यात

आली. तर आत्मचरित्रातून दलित, स्त्रिया, कलावंत, पत्रकार, उद्योगपती, डॉक्टर, लेखक यांचे भावानुभव प्रकट झाले. प्रवासवर्णनातून विविध देशांची संस्कृती, इतरांशी संवाद साधण्यातून निर्माण झालेले नाट्य आविष्कृत झाले. तर व्यक्तीचित्रणातून व्यक्तींचे मन व त्यांची वर्तनवैशिष्ट्ये कलात्मकतेने शब्दबध्द झाली. त्याचप्रमाणे कलावंत हा सामान्य माणूसच आहे याचे दर्शन घडले तर विनोदी वाङ्मय मिस्किलता, हजरजबाबीपणा, आत्मपरिक्षण करण्याची वृत्ती यांनी शब्दांकित झाले आहे.

कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार करताना कादंबरीची व्याख्या, कथानक, स्वभावरेखाटन, वातावरण, मनोविश्लेषण, भाषाशैली या घटकांचा विचार करण्यात आला.

थोडक्यात, साठोत्तरी साहित्यविश्व व कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार यांचा स्थूल विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणात साहित्यिक - 'वि. शं. पारगावकर' यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला आहे. या प्रकरणात वि. शं. पारगावकर यांचा जन्म, बालपण, बालपणाचे संस्कार, शिक्षण, व्यवसाय, व्यासंग, लेखन या मुद्यांच्या आधारे विवेचन केले.

तिसऱ्या प्रकरणात "अपरंपार" या कादंबरीचा आशय व अभिव्यक्तीदृष्टया विचार केलेला आहे. या कादंबरीत खालील काही वैशिष्ट्ये असली तरी काही दोषही जाणवतात. उदा. नंदाच्या उरोजाचे वर्णन ( पृष्ठक्रमांक ४०, ४३ ) येथे येते.

हे वर्णन अतिरंजित वाटते. त्याचप्रमाणे इंद्रनाथ कुसुमवर जो अत्याचार करतो ( पृष्ठक्रमांक ८१, ८२ ) तो देखिल अस्वाभाविक वाटतो. थोडक्यात वर्णनातील अस्वाभाविकता हा दोष या कादंबरीत जाणवतो. आटोपशीर कथानक, वेधक व्यक्तीचित्रे, प्रभावी जीवनदर्शन, परिणामकारक संघर्ष, कथानकाला गती देणारा व्यक्ती- व्यक्तीतील परस्पर संबंध, आशयानुरूप भाषाशैली, अन्वर्थक शीर्षक, आकर्षक प्रारंभ व शेवट ही या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत.

चौथ्या प्रकरणात " अयोनिजा " या कादंबरीचा आशय व अभिव्यक्तीदृष्ट्या विचार मांडला आहे. ' अयोनिजा ' या कादंबरीत काही दोष आहेत. द्रौपदीच्या जीवनावरील कादंबरी असूनही ' द्रौपदी वस्त्रहरणाचा ' प्रसंग वगळलेला आहे. तसेच श्रीकृष्णाचे अप्रत्यक्ष असेच चित्रण येते. हे दोष असले तरी ही कादंबरी पुराणकालीन व्यक्तींच्या मनातील भावभावना चैतन्यपूर्णतेने व्यक्त करण्यात यशस्वी झालेली आहे. ती पात्रेदेखिल लौकिक होती. साधी माणसे होती. आपणासारखेच त्यांच्या मनात अंदाज आणि क्षुद्र भावनांचे तांडव माजत होते , याची कल्पना ही कादंबरी वाचल्यावर कोणालाही होईल. बांधेसूद कथानक, ठळक व्यक्तीचित्रे, अंतर्मुख करणारे जीवनदर्शन, मनोभाव प्रकट करणारा संघर्ष, व्यक्ती - व्यक्तीतील स्नेह, द्वेष आदी भावांनी गुंफलेले परस्पर संबंध, यथार्थ शीर्षक, आकर्षक प्रारंभ व शेवट ही या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत.

' अपरंपार ' व ' अयोनिजा ' या दोन कादंबऱ्यांची तुलना केली असता काही

साम्याचे तसेच काही भेदाचेही मुद्दे लक्षात येतात.

साम्य : या दोन्ही कादंबऱ्या मानवी भावभावनांचे यथार्थ दर्शन घडवतात. स्त्रीच्या मनामध्ये विविध भाव- भावनांचा कोंडमारा झाल्यानंतर केवढी खळबळ माजते. तिचे दुःख बऱ्याचदा मूकपणे व क्वचित प्रकट स्वरूपात कसे व्यक्त होते हे दोन्ही कादंबऱ्यांच्या नायिकांच्या चित्रणावरून स्पष्ट होते. या दोन्ही कादंबऱ्यातील पुरुषपात्रे ही असहाय्य आहेत , असमर्थ आहेत. नायिकांचे दुःख पूर्णपणे नष्ट करण्यात ती यशस्वी होत नाहीत. दोन्ही कादंबऱ्यांतून लेखकाचा जीवननाट्याकडे पाहण्याचा अगत्यशील, भावात्मक दृष्टिकोन स्पष्ट होतो. या दोन्ही कादंबऱ्या शोकात्म आहेत.

या दोन्ही कादंबऱ्यातील भेद पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| अपरंपार | अयोनिजा |
| --- | --- |
| - ही सामाजिक कादंबरी आहे. | - ही पौराणिक कादंबरी आहे. |
| - काम आणि पुरुषार्थ हे या कादंबरीचे केंद्रबिंदू आहेत. | - धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हे चारही पुरुषार्थ या कादंबरीचे केंद्रबिंदू आहेत. |
| - या कादंबरीतील घटना बीड शहर, नेबाचे माहेर, सासर याठिकाणीच घडतात. | - या कादंबरीतील घटना कुरुवंशाच्या राज्याच्या सीमामध्ये अनेक ठिकाणी घडतात. |

| | |
|---|---|
| - या कादंबरीत नीतिमूल्यांच्या संदर्भात, सुखाच्या संदर्भात मेवक प्रश्नांची चर्चा येते. | - या कादंबरीत संपूर्ण मानवीजीवनाच्या संदर्भात त्यातील धर्म, नीती, अहंकार, महत्वाकांक्षा यांची चर्चा येते. |

या दोन्ही कादंबऱ्यातील जीवन दर्शन जरी पुराणकालीन व वर्तमानकालीन असले तरी दोन्ही कादंबऱ्यांतून आपल्याला जाणवते ते व्यक्तींच्यापुढे उभे राहणारे प्रश्न, त्यांना व्यक्तीव्यक्तींनी दिलेला प्रतिसाद , त्यांच्या संबंधातून निर्माण होणारे ताण- तणाव , नियती, परिस्थिती यांचा प्रभाव व यातून अपरिहार्यपणे होणारी शोकांतिका. ही शोकांतिका साठोत्तरी काळात जगणाऱ्या संवेदनाक्षम मनाच्या कलात्मक दृष्टीची व त्यास आकलन झालेल्या भावविश्वाचे कलात्मक शब्दांकन करणाऱ्या कृतींचीच रसिकांना आठवण करून देते. व यात वि. शी. पारगावकर यशस्वी झाले आहेत असे म्हणावेसे वाटते.

## संदर्भग्रंथ सूची


१. (संपा.) कुलकर्णी अ. अ. प्रदक्षिणा , कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७६

२. कुब्येर वसंत न. 'अपेक्षा भंग करणारी कादंबरी 'अयोनिजा'.

तरुन भारत, पुणे दि. ३०-०६-८५

३. गाडगीळ बाळ, 'वि.शं.पारगावकर : व्यक्ती आणि लेखक.' ललित, मुंबई सप्टेंबर १९८९

४. गोरे दादा, 'वि. शं. पारगावकर : एक मनस्वी साहित्यिक,' दैनिक

लोकमत, औरंगाबाद. ४जुलै १९९२.

५. चपळगावकर नरेंद्र, 'वि. शं. पारगावकर माझा गाववाला लेखक, मराठवाडा,

औरंगाबाद दि. ०९-०१-१९९३

६. जोशी लक्ष्मण शास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड ७ वा,' महाराष्ट्र राज्य साहित्य

संस्कृती मंडळ, मुंबई. १९७७.

७. जोशी लक्ष्मण शास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड १२ वा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९८५.

८. देशपांडे अ.ना. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास.' खंड पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे १९७४.

९. देशपांडे अ. ना. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास.' खंड दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे १९७०.

१०. (संपा.) फुंडे दत्तात्रय,' लजळती लकेर ,' प्रतिमा प्रकाशन, पुणे १९७०

११. चापट प्रभाकर व गोडबोले नारायण, ' मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास )
व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७

१२ भावे स. शि. ' निवडक पारगावकर, : समग्र लेखकाच्या अभ्यासाचे प्रश्न '
'निवडक पारगावकर च्या निमित्ताने ' मध्ये, पुणे दि. ०२ मार्च १९८५.

१३. फडके भालचंद्र, "दलित साहित्य : वेदना व विद्रोह " , विद्याप्रकाशन , पुणे १९७७.

१४. संत जान्हवी, " कादंबरी एक वाङ्मय प्रकार, ' मोघे प्रकाशन , कोल्हापूर १९७१.